# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२

**( सकाळी ०९.०० ते १०.४५ वाजेपर्यंत )**

**(अ) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**( सकाळी ०९.०० ते १०.०० वाजेपर्यंत )**

**(मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते ७)**

(१) **सर्वश्री अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, राजेश टोपे, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, कुमारी आदिती तटकरे, श्री. अनिल पाटील, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री. दिलीपराव बनकर, सुनिल भुसारा, संजय जगताप, विक्रमसिंह सावंत, बाळासाहेब थोरात, शिरीष चौधरी, अमीन पटेल, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अस्लम शेख, विकास ठाकरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"आशियातील सर्वात मोठे दुसऱ्या क्रमांकाचे रुग्णालय अशी नागपूर वैद्यकीय महाविद्यालयाची ओळख असणे तथापि या महाविद्यालयाच्या रुग्णालयात वेळेवर व्हेंटिलेटर न मिळाल्याने वैष्णवी राजू बागेश्वर नावाच्या एका सतरा वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर शरद कुचेवार यांना कळविण्यात येऊनही व्हेंटिलेटर उपलब्ध न होणे, रुग्णाचे आई वडील वीस तास अंबुबॅगचा फुगा दाबून लेकीला कृत्रिम श्वास देत होते परंतु आई-वडिलांच्या समोर मुलीचा व्हेंटिलेटर अभावी मृत्यू होणे, तसेच मेडीकल व इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ही दोन्ही रुग्णालये गोरगरीब जनतेचा आधार असणे, दोन्ही रुग्णालयात खाटा समान असतानाही मेयो मध्ये मेडिकलच्या तुलनेत अर्धाच कर्मचारी वर्ग कार्यरत असणे, येथे औषधांचा तुटवडा निर्माण झालेला असणे, डॉक्टरांनी संपलेल्या औषधांची यादी सूचना फलकावर लावलेली असून रुग्णाच्या नातेवाईकांकडून औषधांसह सर्जिकल साहित्य हातमोजे इत्यादी मागविण्यात येणे, औषधे आणि वैद्यकीय उपकरणांची खरेदी हाफकीन मार्फत करण्याची सक्ती केल्यामुळे, आणि यासाठी

हाफकीनला आलेले अपयश यामुळे रुग्णांची होत असलेली फरपट, मेयो रुग्णालयाची इमारत जीर्ण असून तिची दुरुस्ती करण्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, पन्नास किमी पेक्षा जास्त अंतरावरून आणलेल्या २१८ रुग्णांचा मृत्यू होणे, तसेच कर्मचाऱ्यांची पदोन्नती आणि रिक्त जागा भरण्यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **ॲड.आशिष शेलार, ॲड.पराग अळवणी, सर्वश्री. अमित साटम, प्रशांत ठाकूर, योगेश सागर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. किसन कथोरे, सुनील राणे, अमीन पटेल, अशोकराव चव्हाण, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, सुरेश वरपुडकर, अमित देशमुख, अमित झनक, श्रीमती सुलभा खोडके, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. झीशान सिद्दिकी, अस्लम शेख, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), कुमारी प्रणिती शिंदे, सर्वश्री. कुणाल पाटील, संग्राम थोपटे, संजय जगताप, ऋतुराज पाटील, कालीदास कोळंबकर, संतोष दानवे, राम कदम, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्री. मंगेश चव्हाण, विक्रमसिंह सावंत, शिरीष चौधरी, ॲड. राहूल कुल, सर्वश्री. जयकुमार गोरे, महेश लांडगे, अभिमन्यु पवार, अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील जे.जे. रुग्णालयात औषधांचा तुटवडा जाणवत असल्याने काही प्राथमिक औषधेही रुग्णालयात मिळत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवडयात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, दररोज आवश्यक असलेल्या अत्यावश्यक औषधांचा साठ्यावर लक्ष ठेवण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन करण्यात आल्यानंतरही जे.जे. रुग्णालयात मोठया प्रमाणात औषध टंचाई असल्याने रुग्णांना बाहेरुन काही प्राथमिक औषधे घ्यावी लागत असणे, जे.जे. रुग्णालयात येणारे रुग्ण आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील असतानाही त्यांना सर्व आवश्यक असणारा औषधांचा पुरेसा साठा ठेवण्यात न येणे, याकडे महापालिका प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, त्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये शासनाविषयी रोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.महेंद्र दळवी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"पी.एन.पी. कंपनीला देण्यात आलेल्या शासकीय क्षेत्राचा व सीआर.झेड नियमांचे कंपनीने उल्लघंन करुन शासनाचा महसूल बुडविल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये उघडकीस येणे, पी.एन.पी. कंपनीने अलिबाग मुरुड तालुक्यातील सी.आर.झेडच्या

विधानसभा असुधारित प्रत

उल्लघंनाची माहिती अलिबाग प्रांत अधिकारी कार्यालयाने शासनाला दिली असणे, धरमतर येथील पी.एन.पी. कंपनीने इमारती सी.आर.झेडचे उल्लघंन करुन बांधणे, अलिबाग तालुक्यातील शहाबाज येथील पी.एन.पी. कंपनीने सरकारी जमिनीवर सी.आर.झेडचे उल्लघंन करुन बेकायदेशीर इमारत बांधल्या प्रकरणी महूसल व वन विभागाने जिल्हाधिकारी रायगड यांना इमारत पाडण्याबाबत निदेश देणे, पी.एन.पी. कंपनीने विस्तारीत केलेल्या क्षेत्रामध्ये अनेक जमिनीच्या सातबारा उतारावर कांदळवन क्षेत्राची नोंद असणे, कांदळवन क्षेत्र पी.एन.पी कंपनीकडुन तोडुन येथे अनधिकृत विस्तार करण्यात आलेला असणे, पी.एन.पी.कंपनीला ग्रामपंचायत शाहबाज कडून नियमानुसार नियुक्ती केलेल्या समिती मार्फत स्थळ पाहणी करुन कर आकारणी केली नसणे, याबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष तसेच पी.एन.पी. कंपनीने शासनाचा कोट्यावधी रुपयाचा महसूल बुडविल्या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री. छगन भुजबळ, अजित पवार, धनंजय मुंडे, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. अमित साटम, नितेश राणे, सुभाष देशमुख, ॲड.पराग अळवणी, ॲड.आशिष शेलार, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. प्रशांत ठाकूर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. मंगेश चव्हाण, संजय जगताप, विक्रमसिंह सावंत, बाळासाहेब थोरात, शिरीष चौधरी, अमीन पटेल, विजय वडेट्टीवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

""कातकरी समाजाच्या गरीबी आणि अज्ञानाचा फायदा घेवून नाशिक जिल्ह्यासह अहमदनगर, ठाणे, पालघर, रायगड इत्यादी जिल्ह्यांमध्ये आदिवासी समाजाच्या अनेक बालमजुरांना वेठबिगारीस ठेवल्याच्या घटना माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, माहे सप्टेंबर, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात व त्या सुमारास उभाडे (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील आदिवासी पाड्यावरील १० वर्षाच्या मुलीचा वेठबिगारीमुळे मृत्यू झाल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे,अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर व पारनेर तालुक्यातील सहा बालकांना एक मेंढी व दोन हजार रुपयांत विकत घेवून त्यांच्यावर अत्याचार करून त्यांच्याकडून मजुरी करून घेतली जात असल्याचे दिसून येणे, सदर वेठबिगारी प्रकरणी विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल झालेले असणे,मात्र बेपत्ता मुलांचा आणि फरार आरोपींचा शोध घेण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांकडून दिरंगाई व टाळाटाळ केली जाणे, आदिवासी पालकांनी आपल्या मुलांना पैशांसाठी वेठबिगारी करिता विकण्याचा प्रकार दुर्देवी असून यापुढे अशा घटना घडू नये यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, मात्र याबाबत शासनाकडून दिरंगाई व टाळाटाळ केली जात असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

विधानसभा अप्रकाशित प्रत

(५) **डॉ.जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. अजित पवार, जयंत पाटील, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, दत्तात्रय भरणे, हसन मुश्रीफ, अनिल पाटील, यशवंत माने, शेखर निकम, दिपक चव्हाण, श्रीमती सुमन पाटील, श्री.रोहित पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात स्वमग्नता, गतिमंद (ऑटिझम) न्यूरोलॉजिकल आजाराने त्रस्त लाखो मुले असणे, अशा मुलांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत असतांना शासनस्तरावर कोणतीही उपाय-योजना केली जात नसल्याची गंभीर बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, अशा मुलांसाठी स्पीच,ओटी, बिहेवियरल, सायकॉलॉजिकल इ.बहुअंगीक उपचारपध्दती थेरपी शिवाय भारतातच नव्हेतर जागतिक स्तरावरही औषध उपलब्ध नसल्याची गंभीर बाब, मुंबई, पुण्यासारख्याच शहरामध्ये अशा प्रकारच्या थेरपींची सोय असणे, मात्र लहान शहरे, ग्रामीण भागातील नागरीक या आजाराविषयी अनभिज्ञच असल्याने लाखो मुलांच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, या आजाराची लक्षणे दीड दोन वर्षापासून लक्षात येणे, मात्र सर्वसामान्य,गोरगरिबांना सदर आजाराचे आकलनच होत नसल्याने अशा मुलांकडे दुर्लक्ष होत असून पुढील काळात अशा मुलांना पालकांशिवाय जीवन जगता येत नसणे, जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार प्रत्येक १६० मुलांमध्ये १ मुलाला हा आजार असणे, सदरचा आजार राज्यात झपाट्याने वाढत असणे, सदरची समस्या उग्र स्वरुप घेण्याअगोदरच शासनपातळीवर आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे असणे, त्यासाठी छोटी शहरे तालुका, जिल्हा स्तरावर आरोग्य उपकेंद्र, आरोग्य केंद्रे, तालुका रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, नगरपालिका रुग्णालय, महापालिका रुग्णालयांबरोबरच सोयीच्या ठिकाणी बहुअंगीक उपचारपध्दती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही व उपाययोजना करण्यासाठी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री यांचेकडे दिनांक ३ डिसेंबर, २०२२ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतांनाही, आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच गतिमंद मुलांचे भवितव्य अंधकारमय होत असल्याने त्यांचेमध्ये असलेले चिंतेचे वातावरण, स्वमग्नता न्यूरोलॉजिकल आजाराने त्रस्त असलेल्या लाखो मुलांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

विधानसभा अशासकीय प्रत

(६) **सर्वश्री. अमित देशमुख, बाळासाहेब थोरात, कुणाल पाटील, नानाभाऊ पटोले, डॉ. नितिन राऊत, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री. धिरज देशमुख, झीशान सिद्दिकी, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. अमित साटम, प्रशांत ठाकूर, योगेश सागर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. किसन कथोरे, छगन भुजबळ, अजित पवार, धनंजय मुंडे, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. चेतन तुपे, अतुल भातखळकर, दिपक चव्हाण, हसन मुश्रीफ, राजेश टोपे, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री. बाळासाहेब पाटील, दत्तात्रय भरणे, कुमारी आदिती तटकरे, सर्वश्री. प्राजक्त तनपूरे, संजय बनसोडे, अनिल पाटील, यशवंत माने, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री. रोहित पवार, शेखर निकम, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अस्लम शेख, निलेश लंके, सुभाष धोटे, पृथ्वीराज चव्हाण, बळवंत वानखडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. हिरामण खोसकर, राजेश एकडे, अमीन पटेल, शिरीष चौधरी, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. विकास ठाकरे, राजु पारवे, जितेश अंतापूरकर, राजु आवळे, श्रीमती सुलभा खोडके, ॲड. राहूल कुल, सर्वश्री. जयकुमार गोरे, महेश लांडगे, अभिमन्यु पवार, विश्वजित कदम, ऋतुराज पाटील, श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, सर्वश्री. संतोष दानवे, दिलीपराव बनकर, मंगेश चव्हाण, धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"शिक्षणाचे वारे दुर्गम भागापर्यंत पोहोचविण्याची गरज असताना शिकण्याचा अधिकार डावलत ४३ पटसंख्या असलेल्या दरेवाडी (ता.इगतपुरी, जि. नाशिक) येथील शाळा कोणतेही कारण न देता स्थानिक प्रशासनाने बंद केल्याने विद्यार्थी आणि ग्रामस्थ यांनी बकरी आंदोलन करणे, राज्यातील २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाकडून घेण्यात येणे, यासंदर्भातील निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले असून त्याच्या अंमलबजावणीला देखील सुरुवात झालेली असणे, असे असले तरी या निर्णयाविरोधात पालक-विद्यार्थ्यांकडून निषेध नोंदविला जाणे, याचाच एक भाग म्हणून नाशिकच्या जिल्हा परिषदेत झालेल्या आंदोलनामुळे सर्वांचे लक्ष वेधण्यात येणे, सदर आंदोलन विद्यार्थ्यांनी हक्काचं शिक्षण मिळावं यासाठी करण्यात येणे, शाळा बंद केल्याने या विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर येणे, २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद केल्यास दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना १० ते १५ कि.मी. अंतर पायी चालत जाणे शक्य नसणे, ६ ते १४ वयोगटातील बालकांना उपयुक्त व योग्य प्राथमिक शिक्षण देऊन शिक्षणाचे सार्वत्रीकरण करणे, या सर्व शिक्षा अभियानाच्या मुख्य उद्दिष्टालाच हरताळ फासला जात असल्याचे दिसून येणे, सर्व मुलांना दर्जेदार शिक्षण घेता यावे यासाठी २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद न करण्याबाबत विद्यार्थी व पालकांनी केलेले आंदोलन, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **सर्वश्री. प्रशांत ठाकूर, महेश बालदी, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. अमित साटम, सुनिल प्रभू, अतुल बेनके, संजय जगताप, विक्रमसिंह सावंत, बाळासाहेब थोरात, शिरीष चौधरी, अमीन पटेल, विजय वडेट्टीवार, ॲड. राहूल कुल, सर्वश्री. जयकुमार गोरे, महेश लांडगे, अभिमन्यु पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनाने संच मान्यतेसाठी पहिली ते बारावीच्या विध्यार्थ्यांच्या आधारकार्डची माहिती सरल प्रणालीवर भरणे शाळांना बंधनकारक केले असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ रोजी निदर्शनास येणे, आधारकार्डावरील तपशिलात त्रुटी असल्याने रायगड जिल्ह्यातील जवळपास ४९४८४ विध्यार्थांकडे आधारकार्ड नसल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होणे, आधारकार्डची नोंदणी बंधनकारक असल्यामुळे विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढणे व आधारकार्डवरील चुकांची दुरूस्ती करण्याचे काम शिक्षक व मुख्याध्यापकांनी करणे आवश्यक असणे, आधारकार्डच्या या कामामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण देताना शिक्षकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, शैक्षणिक तसेच विविध योजनांचा लाभ आधारकार्ड असलेल्या विद्यार्थ्यांनाच मिळणार असणे, त्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये शासनाच्या या निर्णयामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले असणे, शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची आवश्यक कार्यवाही व उपाययोजना."

**(ब) : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**( सकाळी १०.०० ते १०.४५ वाजेपर्यंत )**

**(मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना क्रमांक १ ते ३)**

(१) **श्री.सुनील राणे, वि.स.स.**

"बोरीवली (मुंबई उपनगर) विभागातील चारकोप व गोराई शासकीय भूखंडावर अतिक्रमण होत असल्याबाबत" या विषयावरील श्री.सुनील राणे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४३५५ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

विधानसभा अधिकृत प्रत

**(२) ॲड. राहूल कुल, वि.स.स.**

"पुणे जिल्ह्यातील प्रस्तावित रिंग रोड बाबत या विषयावरील श्री.संग्राम थोपटे, वि.स.स. यांचा दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ९० मधील प्रश्न क्रमांक ३५८७४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(३) ॲड. राहूल कुल, वि.स.स.**

"पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (PMRDA) विभागीय कार्यालय दौंड तालुक्यात सुरु करण्याबाबत" या विषयावरील ॲड. राहूल कुल, वि.स.स. यांचा दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ७४ मधील प्रश्न क्रमांक ३७११ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : (क) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा चौसष्ठावा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१३-२०१४ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे चौदावा, पंधरावा, सोळावा, सतरावा, अठरावा, एकोणीसावा, वीसावा व एकवीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

विधानसभा असुधारित प्रत

**(२) संसदीय कार्य मंत्री** : विधानसभेच्या सन २०२२ च्या तिसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण १२० आश्वासनांची यादी तसेच, सन २०२२ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ११९ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवतील.

**(३) कृषी मंत्री** : डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) सहकार मंत्री** : (क) महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकवीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे सर्व कामकाज प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष यांचेकडून एकाधिकारशाही पध्दतीने सुरु असणे" या विषयावरील श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांच्या दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी उत्तरीत झालेल्या म.वि.स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**(५) पर्यटन मंत्री** : महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१३-२०१४, सन २०१४-२०१५, सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या

विधानसभा असुधारित प्रत

वर्षांचे अनुक्रमे एकोणचाळीसावा, चाळीसावा, एकेचाळीसावा, बेचाळीसावा, त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री. अभिमन्यु पवार, ज्ञानराज चौगुले, राणाजगजीतसिंह पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"दिनांक ३० सप्टेंबर, १९९३ मध्ये झालेल्या प्रलयकारी भूकंपात लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील ५२ पेक्षा अधिक गावे जमीनदोस्त झाली आणि जवळपास २ लक्ष घरांना तडे जाऊन क्षतिग्रस्त झाली असणे, ७ हजार पेक्षा अधिक नागरिक तर लाखो जनावरे मयत झाली असणे, या जमीनदोस्त गावांचे पुनर्वसन राज्य शासनाने केले असणे, सदरील पुनर्वसन अंतर्गत बांधण्यात आलेली अनेक गावातील घरे निकृष्ट दर्जाची बांधण्यात आल्यामुळे आजरोजी राहण्यालायक राहिले नसणे, गावातील शासकीय इमारतींची, अंतर्गत रस्ते, नाली, आदींची दुरावस्था झाली असणे, पुनर्वसित गावातील घर वाटपांची प्रकरणे आजरोजी प्रलंबित असून अनेक पात्र लाभार्थी घरापासून वंचित असणे, भूकंपग्रस्त क वर्गवारीच्या गावात भूकंपाच्या भीतीपोटी तत्कालीन स्थितीत नागरिकांनी गायरान गावठाण मध्ये तात्पुरत्या स्वरुपात घरे निर्माण करून राहिली असून अनेक नागरिकांनी गावाशेजारील खाजगी जमिनीत अनोंदणीकृत १०० रु च्या बॉन्डवर खरेदी वा तोंडी संमतीने प्लॉट खरेदी करून घरे बांधली असणे, सदरील घरे भोगवाट्यात नोंद असणे परंतु मालकीहक्क नसल्याने या लाभर्थ्यांना शासनाच्या घरकुल योजना तसेच बँक कर्जाच्या लाभापासून वंचित राहावे लागणे, भूकंपामुळे विस्तारीत वस्तीत मूलभूत सुविधांचा अभाव असणे, राज्य शासनाच्या तसेच स्थानिक स्वराज संस्था व निमशासकीय विभागातील भूकंपग्रस्त नागरिकांचा नोकरीचा अनुशेष शिल्लक असल्याने हजारो भूकंपग्रस्त प्रमाणपत्रधारक नोकरीच्या प्रतीक्षेत असणे, भूकंपग्रस्त भागात सुशिक्षित बेरोजगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले असणे, त्यासाठी अतिरिक्त एमआयडीसी साठी भूसंपादन करून विकसित करण्याची तसेच रोजगार निर्मितीसाठी एखादा मोठा प्रकल्प सदर परिसरात सुरू करण्याची व भूकंपग्रस्तांचे जीवनमान उंचवण्याची नितांत गरज असणे, नैसर्गिक वाढी अंतर्गत सर्व कुटुंबांना घरे व जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक गावासाठी अतिरिक्त भूसंपादन करण्याची गरज असणे, मौजे कारला व कुमठा ता.औसा या गावांचे पुनर्वसनासाठी जिल्हाधिकारी लातूर यांनी सादर केलेला प्रस्ताव तांत्रिक कारणाने राज्य शासन स्तरावर गेली अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, भूकंपाला २९ वर्ष पूर्ण झाली असतानाही भूकंपातील मूलभूत प्रश्न व गरजा प्रलंबित असून भूकंपग्रस्त

भागातील क वर्गवारीच्या गावातील गायरान, गावठाण व इतर शासकीय जमिनीत तसेच गावाशेजारील खाजगी जमिनीत अनोंदणीकृत पद्धतीने प्लॉट पाडून खरेदी केलेली प्लॉट व घरे नियमित करण्याबाबत तसेच नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि विकासाचा अनुशेष व रोजगारांच्या संधी,आरोग्याच्या सुविधा, मूलभूत गरजा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने विशेष निधी मंजूर करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.महेश लांडगे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २६७ अ नुसार दिनांक ४ जानेवारी, २००८ नंतरच्या पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील अवैध बांधकामांना देय मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी अवैध बांधकाम शास्ती कर राज्य शासनाकडून लावण्यात येणे, पिंपरी चिंचवड शहराचे स्थानिक लोकप्रतिनिधी-कडून अवैध बांधकामावरील शास्ती कर संपूर्ण माफ करणेबाबत विधानसभेत लक्षवेधीद्वारे करण्यात आलेले निवेदन, त्याअनुषंगाने तत्कालीन मुख्यमंत्री यांनी शास्ती कर माफ करणेबाबत केलेली घोषणा त्याअनुषंगाने पिंपरी-चिंचवड शहरातील १००० चौरस फुटापर्यंत अवैध बांधकाम वरील संपूर्ण माफ करण्यात आलेला शास्तीकर तसेच १००० ते २००० चौरस फुटापर्यंत ५० टक्के दराने व २ हजार चौरस फुटावरील अवैध बांधकामावरील मालमत्ता कराच्या दुप्पट आकारण्यात येणारा शास्तीकर संपूर्णत: माफ करण्यात यावा अशी सर्वसामान्य शहरवासियांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने संपूर्णत अवैध बांधकामवर शास्ती कर माफ करण्याची आवश्यकता."

(३) **श्री.नारायण कुचे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील बावणेपांगरी, शेलगांव आणि रोषणगांव या महसूल मंडळातील बरीचशी गांवे अतिवृष्टीमुळे झालेल्या अनुदानापासून वगळण्यात आलेले असणे, तसेच बदनापूर तालुक्यातील सदर महसुल मंडळात माहे सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात अतिवृष्टी झाल्याचे निदर्शनास येत असणे, तसेच उपरोक्त महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्यामुळे सदर तिन्ही महसूल मंडळात शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे सुद्धा करण्यात आले किंवा झालेले असणे, तसेच सदर ठिकाणी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांचे झालेले नुकसान भरपाई किंवा

विधानसभा अप्रकाशित प्रत

अतिवृष्टी अनुदान मदत न देण्यात येणे, तसेच सदर नुकसान भरपाई (अतिवृष्टी अनुदान) शेतकऱ्यांना किती दिवसात त्यांच्या नुकसानग्रस्त यांच्या खात्यात जमा करणार अशी मागणी बाधित शेतकरी यांच्याकडून करण्यात येणे, परंतु उपरोक्त प्रकरणी शासनाने शेतकरी यांना अतिवृष्टी अनुदान तातडीने देण्याबाबत अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्याने सामान्य गोरगरीब शेतकरी व सामान्य जनतेतून शासनाच्या प्रति तीव्र संताप पसरलेला असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई किंवा तातडीने करावयाच्या उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.सुनिल शेळके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"मावळ तालुक्यामध्ये पवना, जाधववाडी, शिरे-शेटेवाडी, आंद्रा धरण प्रकल्पग्रस्त यांचे पुनर्वसन गेल्या अनेक वर्ष पाठपुरावा करूनही आजपर्यंत झालेले नसून या स्थानिक प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मावळातील पर्यायी जागेच्या उपलब्धतेनुसार करण्याची प्रक्रिया शासन दरबारी सुरू असणे, सदर पुनर्वसनाच्या बाबत अनेकदा शासन दरबारी बैठका होऊनही अद्याप काही ठोस कृती शासनाकडून झालेली नसणे, अशातच बाहेरील प्रकल्पग्रस्तांचे मावळ तालुक्यात मोठ्या प्रमाणात पुनर्वसन होत आहे ही गंभीर स्वरूपाचे बाब निदर्शनास येणे, मूळ स्थानिक प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनासाठी उपलब्ध असलेले क्षेत्र आणि खातेदार यांची तुलना करता वाटपासाठी क्षेत्र कमी पडत असून सरकारी गायराने किंवा इतर क्षेत्रांमध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असणे, असे असताना तालुक्याबाहेरील लोकांचे मावळात पुनर्वसन केल्याने ७० ते ८० वर्षांपासून पुनर्वसनासाठी प्रतिक्षेत असलेले स्थानिक बाधित खातेदार यावर शासन अन्याय करत असून स्थानिकांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यात यावे या मागणीला शासनाकडून होणाऱ्या अक्षम्य दुर्लक्षामुळे आणि सदर पुनर्वसनासाठी होणाऱ्या विलंबामुळे शासनाविषयी जनतेमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असणे, अशातच बाहेरील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मावळ तालुक्यात होऊ नये याकरिता स्थानिक शेतकऱ्यांकडून शासन दरबारी सातत्याने होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली कार्यवाही तसेच तातडीने करावयाची उपाययोजना."

(५) **सर्वश्री. शांताराम मोरे, श्रीनिवास वनगा, विश्वनाथ भोईर, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"औरंगाबाद जिल्ह्यातील वाळुज परिसराला सुनियोजित नागरी सुविधा देण्यासाठी

विधानसभा अप्रकाशित प्रत

एमआरटीपी अधिनियमांतर्गत सन १९९१ साली सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणुक होणे, सिडकोने सन १९९२ साली विकास योजना तयार करुन अमंलबजावणीस सुरवात करणे, प्रकल्पातील गोलवाडी, तिसगाव, वळदगाव, पंढरपुर व इतर गावातील जमिन संपादनाची कार्यवाही सन १९९६ पासुन सुरु होणे, २६ वर्षाचा कालावधी उलटुनही संपादन कार्यवाही सिडकोमुळे पुर्ण न होणे, सन १९९२ पासुन जमिनी आरक्षण / संपादनाच्या नावाखाली अडकवुन ठेवणे, सिडकोने स्वत:हुन संमतीने निवाडे जाहिर करण्यासाठी भुधारकांबरोबर करारनामे करणे, जमिनी ताब्यात घेऊन त्यावर विकासकामे करणे, २ महिन्याच्या आत निवाडे जाहिर करण्यासाठी मा.उच्च न्यायालायाने दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी आदेश देणे, शासनाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ व दिनांक १४ ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या पत्राव्दारे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेऊन त्वरीत निवाडे जाहिर करण्याचे निर्देश देणे, सिडकोकडुन जिल्हाधिकारी यांना मोबदल्याची रक्कम जमा न करणे, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची पुर्तता न झाल्यामुळे अवमान याचिका दाखल होणे, मा.उच्च न्यायालयाने दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या निर्देशाचे पुर्नविलोकन करण्याबाबतची सिडकोची याचिका सकारण फेटाळणे, सदर विलंबामुळे मोबदल्याच्या रक्कमेत व्याजाच्या रक्कमेने होणाऱ्या वाढीमुळे सरकारी पैशाचा अपव्य होणे व याची जबाबदारी निश्चित होणे गरजेचे असणे, प्रकल्प परवडत नसल्याच्या कारणाने माहे मार्च, २०२० मध्ये प्रकल्पातुन बाहेर पडण्याचा निर्णय घेणे, प्रकल्पातील प्रलंबित भुसंपादनातुन माघार घेण्याचा निर्णय घेणे, नव्याने भुंपादन न करणे, या घेतलेल्या निर्णयांची २ वर्षापासुन जाणीवपुर्वक अंमलबजावणी न करणे, परिणामी या भागाच्या विकासास अवरोध निर्माण होणे, शासनाने लोकप्रतिनिधी यांनी शासनास केलेले निवेदने विचारात घेऊन त्रयस्थ एजन्सी मार्फत प्रकल्पाचा आर्थिक व्यव्हार्ता अहवाल ९० दिवसांच्या आत सादर करण्याबाबत दिनांक ४ जून, २०२१ रोजी निर्देश देणे, सदर निर्देश देऊन आज पर्यंत ४६० दिवसांचा कालावधी उलटुन सुध्दा अद्याप अहवाल सादर न होणे, भुधारकांमध्ये शासन, सिडको यांच्या बद्दल अविश्वासाचे वातावरण निर्माण होऊन शासन, सिडकोची प्रतिमा मलिन होणे, याकरीता सिडकोच्या प्रशासनाची जबाबदारी असणे, त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन करण्याची आणि संपादनाच्या फेऱ्यात अडकलेल्या सामान्य जमिन मालकांना त्यांच्या जमिनीच्या विकास कामासाठी तात्काळ परवानगी देण्यासाठी सिडकोला निर्देश देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

विधानसभा अप्रकाशित प्रत

(६) **श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"परभणी जिल्ह्यातील जिंतूर शहरातील शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या महिलांचे सोशल मीडियावर मॉर्फ केलेले फोटो व्हायरल करून बदनामी करण्यात येत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली असणे या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यावर जवळपास महिनाभरानंतर पोलिसांनी शहरातील एका संशयित तरुणाला ताब्यात घेतलेले असून सदर तपासाचा अहवाल अद्याप आलेला नसणे,त्यामुळे मागील काही दिवसांपासून तहसील कार्यालयातील महिलांचे मॉर्फ केलेले फोटो व्हायरल करून बदनामी केल्याच्या प्रकाराने तहसील कार्यालयात काम करणाऱ्या महिला असुरक्षित असल्याने महिलांमध्ये नाराजी व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **सर्वश्री सुनिल प्रभू, अतुल बेनके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

‘‘पुण्यातील दोन तरुणांनी माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये सेक्सटॉर्शनमुळे आत्महत्या केल्याची घटना घडणे, सदरहू प्रकरणाचा तपास पोलीसांनी केला असता सदरहू दोन तरुणांना नग्न छायाचित्रे आणि व्हिडीओ सोशल मिडीयावर वायरल करण्याची धमकी देऊन दोघांना ब्लॅकमेल करण्यात येत असल्याने त्यास कंटाळून तरुणांनी अखेर टोकाचे पाऊल उचलून आत्महत्या केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न होणे, यामुळे पुणे शहरात खळबळ निर्माण झाल्याने पोलीसांनी सदर प्रकरणाच्या मुळाशी जाण्याचा निर्णय घेऊन कार्यवाही करणे, सेक्सटॉर्शन रॅकेटचा माग काढत पुणे पोलीस राजस्थानातील अलवर जिल्ह्यातील लक्ष्मणगढ तालुक्यातील गुरुकोठडी गावात पोहोचले असता संपूर्ण गावच सेक्सटॉर्शनचे रॅकेट चालविण्यात येत असल्याची धक्कादायक व खळबळजनक माहिती उघडकीस येणे, सदरहू प्रकरणातील मुख्य आरोपी अन्वर खान याला राजस्थानात सापळा रचून व गुंगारा देण्याचा प्रयत्न केला असता अडीज किलो मिटर पाठलाग करुन त्यास पुणे पोलीसांनी अटक करणे, सदरहू गुरुकोठडी गावातील २५०० जण सेक्सटॉर्शनचे रॅकेट चालवित असल्याची कबुली आरोपीने देणे, प्रथम सोशल मिडीयावर बनावट अकाऊंट बनवून रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या महिलेशी फोनवर बोलण्यासाठी आमिश दाखविण्यात येणे, यानंतर व्हिडीओ क़ॉल करुन जाळयात अडकलेल्या व्यक्तीला फोटो शेअर करण्यात सांगण्यात येणे, हे फोटो मॉर्फ करुन टार्गेट केलेल्या व्यक्तीला आक्षेपार्ह अवस्थेत दाखवले जाते, तद्नंतर तोच फोटो वा व्हिडीओ सोशल मिडियावर शेअर करण्याची धमकी देऊन लाखो रुपये उकळण्यात येऊन आर्थिक लूट करण्यात येत असल्याचे तपासातून उघड होणे, राजस्थानमध्ये सुरु असलेल्या या सेक्सटॉर्शनच्या रॅकेटमध्ये टीसी व न्यायाधिश तसेच राज्यातील सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरीकांना देखील

विधानसभा अप्रकाशित प्रत

ब्लॅकमेल करुन आर्थिक फसवणूक करण्यात असल्याचे अनेक घटनांतून निदर्शनास येणे, मुंबईसह राज्यात मोठ्या प्रमाणात सोशल मिडियाचा वापर करुन सेक्सटॉर्शनच्या घटना घडत असणे, यामध्ये कमी प्रमाणात घटना उघडकीस येत असणे, अशा घटनांमुळे समाजावर दुष्परिणाम होऊन देशाचे भवितव्य असलेले उच्च शिक्षीत तरुण पिढी वाया जाऊन जीव गमावण्याचा निर्माण झालेला गंभीर धोका, सदरहू प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेऊन सायबर क्राईम ॲक्टमध्ये कठोर तरतुद करुन कायदा मंजूर करुन त्याची प्रभावीपणे अमंलबजावणी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(८) **श्री.सुभाष धोटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"राज्यातील चंद्रपूर जिल्हा स्थित कोरपना तालुक्यातील नांदाफाटा आवारपुर बीबी या परिसरातील जवळपास ११०० ते १२०० नागरिकांचे आधारकार्ड, बँक पासबुक सन २०१८ मध्ये एजंट मार्फत प्रधानमंत्री आवास योजनेचे अर्ज भरून जमा करण्यात आले असणे; ज्या नागरिकांना राहण्यासाठी घरे नाहीत, ज्यांना घराची अत्यावश्यकता आहे, अशा लोकांसाठी प्रस्ताव तयार करून महाराष्ट्र गृहनिर्माण सोसायटी कडे सादर करण्यात आल्यानंतर माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये या योजनेला मंजुरी मिळाली असणे; ज्यांना घर आहे, अशा नागरिकांना घरांची आवश्यकता आहे, अशी दिशाभूल करणारी माहिती तयार करून म्हाडा या संस्थेला पाठविण्यात आली असणे; टाऊन प्लॅनिंग मध्ये वेगळे शहर वसविण्याकरिता रेरा कायद्या अंतर्गत कमीत कमी १०० एकर जागेची आवश्यकता आहे परंतु ५५ एकर जागा असताना सुद्धा या प्रकल्पाला मंजुरी मिळाली असणे; सदर योजनेला मंजुरी मिळाल्यानंतर ज्या नागरिकांच्या नावांच्या आधारे मंजुरी मिळवली त्यांना घरे देणे अपेक्षित होते परंतु तसे झाले नसणे; सदरहू योजनेकरिता ज्या नावांची यादी पाठवण्यात आली त्यातील २० लोकांनी सुद्धा यात घर बुकिंग केले नसणे; पतीच्या नावाने घर असताना सुद्धा पत्नीच्या नावाने फ्लॅट बुकिंग केले असून अशा लोकांना प्रधानमंत्री आवास योजने मधून रु.२ लाख ५० हजाराचे अनुदान देणे नियमबाहय असणे; प्रधानमंत्री आवास योजनेचे अनुदान मिळत असल्याने यशोधन विहार प्रकल्पाच्या मॅनेजमेंट कडून नागरिकांची दिशाभूल करून परिवारातील इतर सदस्यांच्या नावे फ्लॅट घेण्याकरिता प्रोत्साहित करण्यात येत असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे; नांदा हा ग्रामीण भाग असल्याने प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना १३०००० + १८००० = १४८०००/- अनुदान मिळते परंतु मागील दोन वर्षात एकाही लाभार्थ्याला प्रधानमंत्री आवास योजनेतून घर मिळाले नसणे; एकीकडे नागरिकांना अनुदान मिळत नाही तर दुसरीकडे बिल्डरच्या फायद्यासाठी म्हाडा योजनेतून डायरेक्ट बिल्डरच्या खात्यात प्रधानमंत्री आवास योजनेचे प्रती लाभार्थी २.५ लाख रुपये अनुदान देण्यात येत असून थेट बिल्डरला अनुदान मिळत

विधानसभा असुधारित प्रत

असल्याने नागरिकांची फसगत होणे; याप्रकरणी असंख्य तक्रारी असूनही संबंधित शासकीय अधिकारी, विकासक यांचेवर कोणतीही कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष; याबाबत शासनाने तातडीची दखल घेऊन फसगत झालेल्या लोकांना न्याय मिळवून देण्याकरिता शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व उपाययोजना."

(९) **श्री.रवि राणा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्य सरकारने राज्यामध्ये पिण्याचे पाणी आणि शेतीला सिंचनासाठी पाणी मिळण्यासाठी मोठे प्रकल्प हाती घेऊन सर्व नागरिकांना पिण्याचे पाणी, शेतकऱ्यांना सिंचनाचे पाणी मिळण्यासाठी मोठ्या योजना हाती घेतल्या असणे, असे असताना मौजे परसोडा, मसोद तालुका अमरावती येथे निलेश चौरसिया यांनी स्टोन इंडस्ट्रीज परसोडा येथील गट नंबर ४३, २० व १२ मध्ये विनापरवाना अग्रीम स्वामीत्वधनाचा भरणा न करता गौण खनिजाची अवैध साठवणूक व स्फोटक रासायनिक पदार्थ जिलेटिन कांड्या वापरून बोअर ब्लास्टिंग करून  ज्या मुळे आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या घरांना तडे गेलेले असणे, त्यांच्या शेतामध्ये असलेल्या विहिरीचे पाणी आटणे या बाबतीत शेतकऱ्यांनी माहे डिसेंबर, २०२२ च्या दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयात सदर स्टोन इंडस्ट्रीज हे बंद करून बोअर स्फोटक ब्लस्टिंग बंद करून व त्या मालकांनी गौण खनिज माल अवैध साठवणूक केली त्याची चौकशी करून या संबंधाने शेतकऱ्यांनी शेतमजुरांची मागणी केली असणे, सदर खदान मालक विरुध्द जिल्हाधिकारी कार्यालयाचे यंत्रणा, पोलीस विभाग यंत्रणा यांनी संयुक्त रित्या धाड टाकून तेथील मुद्देमाल पाहणी दरम्यान आढळुन आल्याने संबंधित खदान मालक यांच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयाने रिपोर्ट देऊन पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला असणे, दंड ठोठावला असणे परंतु सदर खदान मालक हा शासकीय यंत्रणेच्या प्रमुखांना न जुमानता त्यांनी आपला धंदा सर्रासपणे सुरू असणे, यावर शासनाने तातडीने लक्ष घालण्याची गरज असणे जेणेकरून शेतकरी शेतमजूर यांना या प्रकरणी न्याय मिळवून देण्यासाठी आमरण उपोषणाचा इशारा दिलेला असणे, सदरची बाब गंभीर असणे, या संबंधाने शासनाने कठोर पावले उचलण्याची गरज असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **सर्वश्री. विनोद निकोले, हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, राजेश पाटील, श्रीनिवास वनगा, शांताराम मोरे, सुनिल भुसारा, सहसराम कोरोटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनाच्या शासकीय व निमशासकीय विभागामध्ये राज्यात ०१ लाख २५ हजार बोगस लोकांनी आदिवासी असल्याचे बोगस दाखले जोडून नोकऱ्या मिळवल्या असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात व त्या सुमारास निदर्शनास येणे, यासंदर्भात पालघरच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर विविध संघटनांच्या मार्फत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मोर्चाचे आयोजन करण्यात येणे, राज्यात बोगस आदिवासींना सेवासंरक्षण देण्याचा, नोकरीत कायम करण्याचा व सर्व आर्थिक लाभ देण्याचा दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ रोजी राज्य सरकारने निर्णय घेणे, या विरोधात राज्यातील आदिवासी समाजात तीव्र नाराजी पसरणे, खऱ्या आदिवासींवर अन्याय करणारा शासन निर्णय तात्काळ मागे घेण्याबाबत राज्यात विविध ठिकाणी आंदोलने होणे, बोगस लोकांना सेवा संरक्षण देऊ नका अशी मागणी होणे, खोट्या व बनावट जात प्रमाणपत्रांआधारे आदिवासींच्या नोकऱ्या बळकाविणाऱ्या बोगस आदिवासींवर गुन्हे दाखल करणे व त्यांना अटक करा अशी मूळ आदिवासी बांधवांकडून मागणी होत असणे, त्यांच्याकडून सर्व आर्थिक लाभ वसूल करणे, त्यांना अधिसंख्य पदांना दिलेली मुदतवाढ थांबवणे, दिनांक ६ जुलै, २०१७ व दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी शासनाने करणे, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग अधिनियम, २००० मधील अनुसूचित जमातीसाठी असलेल्या संरक्षण तरतुदींचा भंग करणाऱ्या सचिवांवर कारवाई करणे, अनुसूचित जमातीच्या अवैध प्रमाणपत्र धारकांवर व ते देणाऱ्या अधिकाऱ्यांवर अधिनियम, २००० मधील नियम २००३ मधील कलम १० व ११ व नियम १३ च्या तरतुदीनुसार शिक्षा व दंडात्मक कारवाई करणे, आदिवासींची विशेष पदभरती मोहीम सुरू करणे बाबत मागणी होणे, महाराष्ट्र सरकारने दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ रोजी घेतलेल्या निर्णय मुळे सुमारे हजारो बोगस आदिवासींना सेवासंरक्षण देण्याचा व नोकरीत कायम करण्याचा हा निर्णय खऱ्या आदिवासींवर अन्याय करणारा असणे यावर शासनाची करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(११) **श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"दि रेल्वे क्लिअरिंग अँड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस बोर्ड, मुंबई अर्तंगत माथाडी कायदा १९६९ व महाराष्ट्र शासन दिनांक २१ जानेवारी, २००९ च्या आदेशानुसार मे.आर.सी.एफ.लि.चेंबुर येथे टोळी क्र.१९५ व गट 'ड' कार्यरत असणे, सदर गटातील

विधानसभा अधिकृत प्रत

काही कर्मचाऱ्यांची नियमबाहय बदली केल्याने टोळी क्र.१९५ मधील कामगारांनी बोर्डाकडे दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी तक्रार नोंदवणे, तक्रार नोंदविल्याने दिनांक २० जानेवारी, २०२० पासून टोळीतील कर्मचाऱ्यांना काम न देणे, अचानक सरकारी कामगार अधिकारी तथा सचिव, दि रेल्वे क्लिअरिंग अँड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस बोर्ड, मुंबई यांनी माथाडी कायदा आणि महाराष्ट्र शासनाचा दिनांक २१ जानेवारी, २००६ चा निर्णय धाब्यावर बसवून दिनांक ४ जुलै, २०२२ रोजीच्या पत्राद्वारे आदेश पारीत करून टोळी क्र.१९८ मधील कामगार खुर्शिद बेग, सदाशिव पुकळे व रमेश नांगरे यांना आर्थिक लाभाच्या बदल्यात टोळी क्र.२५० मध्ये बदली करणे, त्यातही केवळ खुर्शिद बेग यांनाच कामावर रूजू करून घेणे, सदाशिव पुकळे व रमेश नांगरे यांना कामावर रूजू करून न घेणे, अन्य कामगारांबाबत आकस बाळगून अन्याय करणे,कामगारांच्या ठेवीच्या गैरव्यवहार प्रकरणी मा.कामगार मंत्र्यांच्या आदेशानुसार मा.विकास आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीने २५ कोटी ७० लक्ष रूपयांचा कामगारांच्या ठेवी संबंधी अध्यक्ष, लेबर बोर्ड यांनी गैरव्यवहार केल्याबाबत ठपका ठेवून पोलिस चौकशी प्रस्तावित करणे, सचिव, नवीन अखिल महाराष्ट्र माथाडी वाहतूक आणि जनरल कामगार संघटना यांनी दिनांक ३ ऑगस्ट, २०२२ रोजी सह आयुक्त कामगार (माथाडी) यांच्याकडे रेल्वे मंडळ सचिव, यांनी नियत वाटपाबाबत दिनांक २० जून, २०२२ च्या आदेशाची अंमलबजावणी केली नसल्याने व हेतुपुरस्सर दुर्लक्ष करून टोळी क्र.१९५ च्या कामगारांना कामापासून वंचित ठेवणे, त्यांच्या या कृतीमुळे कामगार आर्थिक अडचणीत सापडणे, त्यामुळे दिनांक ८ एप्रिल, २०२२ रोजीच्या सचिव, दि रेल्वे क्लिअरिंग अँड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस बोर्ड,मुंबई यांच्या आदेशा विरूध्द आक्षेप नोंदवून दि रेल्वे क्लिअरिंग अँड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस योजना १९७६ च्या कलम (३७) अर्तंगत सदर आदेशाविरूध्द अपील दाखल करणे, त्यावर अद्याप सुनावणी न करणे, हयाबाबत झालेल्या गैरव्यवहाराची तातडीने चौकशी करून दोषींविरुध्द आरोप पत्र दाखल करण्याची आवश्यकता व कामगारांना तातडीने कामावर रूजू करून घेऊन त्यांची आर्थिक कोंडीतून सोडवणूक करण्याची नितांत गरज विचारात घेता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

विधानसभा असुधारित प्रत

**चार : मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचा म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रस्ताव :-**

"पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियमांतील नियम २६० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

**पाच : सन २०२२-२०२३ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस).**

(१) नगरविकास विभाग

(२) सार्वजनिक बांधकाम विभाग

(३) ग्रामविकास विभाग

(४) महिला व बालविकास विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ – महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२.

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अजित पवार, चेतन तुपे, छगन भुजबळ, भास्कर जाधव व रविंद्र वायकर,वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक १३ - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२२ नापसंत करते."

(ख) **सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अजित पवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, संजय जगताप, अमित झनक, संग्राम थोपटे व सुनिल केदार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय

विधानसभा असुधारित प्रत

(विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री भास्कर जाधव व रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री चेतन तुपे, अजित पवार, छगन भुजबळ, भास्कर जाधव, रविंद्र वायकर व बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२२ चा अध्यादेश क्रमांक ९ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०२२ नापसंत करते."

(ख) **सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अजित पवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, संजय जगताप, अमित झनक, संग्राम थोपटे व सुनिल केदार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व

विधानसभा अप्रकाशित प्रत

पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री भास्कर जाधव व रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) **सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, सुनिल केदार, संजय जगताप व जितेश अंतापूरकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ – महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

विधानसभा असुधारित प्रत

**(मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सात : सर्वश्री रणधीर सावरकर, समीर कुणावार, प्रशांत बंब, अभिमन्यू पवार, भरतशेट गोगावले, राम सातपुते, ज्ञानराज चौगुले, राजेश पवार, संजय गायकवाड, डॉ. देवराव होळी, सर्वश्री संजय शिरसाट, नारायण कुचे, डॉ. संजय रायमुलकर, डॉ. संजय कुटे, सर्वश्री किर्तीकुमार भांगडीया, रमेश बोरनारे, प्रदिप जैस्वाल, ॲड आकाश फुंडकर, ॲड आशिष जैस्वाल, सर्वश्री दादाराव केचे, बालाजी कल्याणकर, संभाजी पाटील-निलंगेकर, मोहन मते, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री किशोर जोरगेवार, जयकुमार रावल, नरेंद्र भोंडेकर, संजय सावकारे, बच्चू कडू, मंगेश चव्हाण, भिमराव तापकीर, सुरेश भोळे, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री प्रशांत ठाकूर, नितेश राणे, बबनराव लोणीकर, संतोष दानवे, तानाजी मुटकुळे, हरिभाऊ बागडे, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, श्री. राणाजगजितसिंह पाटील, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, समाधान आवताडे, सुभाष देशमुख, हरिष पिंपळे, सुनिल कांबळे, ॲड राहुल कुल, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री राम कदम, किसन कथोरे, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री समीर मेघे, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, टेकचंद सावरकर, संजिवरेड्डी बोदकुरवार, मदन येरावार, डॉ. तुषार राठोड, प्रा.डॉ. अशोक उईके, डॉ. संदिप धुर्वे, सर्वश्री राजेंद्र पाटणी, प्रकाश भारसाखळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) :-**

" मागील सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येणे, विशेषत: विदर्भातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारा वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प असेल, समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशात वळवून हा प्रदेश सुजलाम् सुफलाम् करणारा प्रकल्प असेल अथवा विदर्भ व मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी युती सरकारच्या काळात सन २०१७-१८ च्या दरम्यान मंजूर करण्यात आलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इत्यादींचे काम थंड बस्त्यात टाकण्यात येणे, विदर्भ-मराठवाड्यासह उत्तर महाराष्ट्रातील

विधानसभा अप्रकाशित प्रत

शेतकऱ्यांसाठी व नागरिकांसाठी वरदान ठरणारा समृद्धी महामार्ग डिसेंबर २०२१ मध्ये सुरू होणे अपेक्षित असताना मागील सरकारच्या संथ कारभारामुळे प्रकल्पाचे काम रखडणे, परंतु नव्या सरकारने जनभावना लक्षात घेऊन नुकतेच समृद्धी महामार्गाचे पहिल्या टप्प्याचे लोकार्पण करणे, त्याच वेळेस समृद्धी महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचेही काम तात्काळ पूर्ण होऊन त्याचेही लोकार्पण होण्याची जनतेची वाढती मागणी, एडीबीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये जिल्हे निवडताना विदर्भातील जिल्ह्यांवर अन्याय झाल्याचे निदर्शनास येणे, गत २ वर्षांत विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात अतिवृष्टी होऊनही पुरेशी मदत शेतकरी बांधवांना न मिळणे, शेतकऱ्यांची दिवसा वीज मिळण्याची मागणी मागील सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे, मागील सरकारच्या कार्यकाळातील अक्षम्य दुर्लक्षामुळे विदर्भ व मराठवाड्याच्या अनुशेषात वाढ होणे, जुलै २०२२ मध्ये राज्यात सत्तांतर झाल्यानंतर विदर्भ-मराठवाड्याशी संबंधीत वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशाकडे वळविण्याचा प्रकल्प, बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प व प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेला चालना मिळणे, रस्त्यांचे जाळे विकसित करण्यासाठी विदर्भ-मराठवाड्यातील जिल्ह्यांना पुरेसा निधी प्राप्त होणे, विदर्भ, मराठवाडा व कोकणातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी नवीन सरकारने विशेष तरतूद करण्याची गरज, तसेच धान, सोयाबीन, कापूस व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना चांगला दर मिळावा याकरीता धान, सोयाबीन व संत्रा इत्यादी आधारीत प्रक्रिया उद्योगांना चालना देण्याची तसेच, कापसावर प्रक्रिया उद्योगाला गती देण्यासाठी नवीन वस्त्रोद्योग धोरण आणण्याची ज्यामध्ये पारदर्शकता येऊन खऱ्या अर्थाने कापूस प्रक्रिया उद्योगाला चालना मिळेल अशा तरतूदी असण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात आरोग्य सुविधांना बळकटी मिळण्यासाठी या भागातील प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याची नवीन शासनाने केलेली घोषणा व या घोषणेची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात जास्तीत जास्त रोजगार निर्मिती व्हावी याकरीता मागील सरकारने कोणतेही विशेष प्रयत्न न करणे, विशेषत: १८ महिन्यांमध्ये कॅबिनेट कमिटी ऑन इंडस्ट्रीजची एकही बैठक न घेणे, परंतु नवीन शासनाने नुकतीच ७०००० कोटींच्या प्रकल्पांना मान्यता देऊन विदर्भ-मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न करणे, मागील ५ महिन्यांत या सरकारने विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागात अनेक प्रकल्पांना चालना मिळालेली असताना पुढील काळात वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, समुद्रात वाहून जाणा-या १८७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशात वळविण्याचा प्रकल्प, बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना तसेच एडीबी व एचएएम योजनेतंर्गत रस्त्यांचे जाळे विकसित करण्याची व संत्रा, धान, सोयाबीन व कापूस इत्यादी पिकांवर प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी नव्याने धोरण आखण्याची आवश्यकता, विशेषत: SMART, MAGNET योजनेतंर्गत प्रकल्प मंजूर

विधानसभा अधिकृत प्रत

करताना विदर्भ, मराठवाडा या मागास भागाला प्राधान्य देण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प (POCRA) टप्पा-२ व जलयुक्त शिवार टप्पा-२ ची अंमलबजावणी तातडीने सुरू करण्याची गरज, शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी याकरीता प्रत्येक सबस्टेशनला मुख्यमंत्री कृषी सौरवाहिनीला जोडण्याची आवश्यकता, तसेच नव्याने उद्योग विदर्भ-मराठवाड्यात यावेत याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : २० डिसेंबर, २०२२

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

विधानसभा असुधारित प्रत